# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 27/12/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील पाटणसावंगी खापा टी पॉईंट सावनेर येथे दिनांक 26/12/2021 चे 16.50 वा. ते 17.50 वा. दरम्यान सावनेर पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन सावनेर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच. –40/एन–2420 क्रमांकाच्या बोलेरो मॅक्स पिकअप गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– अजय शालीकराम बोहरे, वय 21 वर्ष, रा. लौणखैरी ता. कामठी याच्या ताब्यातुन 8(बैले) कि. 68,000/–रू. चे जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 3,50,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई हेमराज कोल्हे, पो.स्टे. सावनेर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(अ(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, 5(अ)(ब),9,130(1),83,177 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम काद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार संदीप नागरे मो.क्र. 9011596500 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सावनेरचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. मारुती मुळूक यांचे नेतृत्वात सपोनि श्री. फुलेकर, पोलीस हवालदार संदीप नागरे, पोलीस शिपाई हेमराज कोल्हे व भुपेश तभाने यांनी यशस्वीरित्या पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर